# प्रेसनोट

## आरोपींविरुध्द मोका कायदयान्वये दोषारोपपत्र दाखल करण्यास परवानगी

खडकी पोलीस ठाणेचे हददीत गुन्हेगारी टोळी तयार करुन, गुन्हेगारी कारवाया करणारा खडकी पोलीस ठाणेचे रेकॉर्डवरील कुख्यात गुन्हेगार रब्बील रज्जाक शेख वय २६ वर्षे रा. जुना बाजार खडकी, पुणे व त्याचे साथीदार राजीक रज्जाक शेख वय २२ वर्षे , मजहर मेहमुद शेख रा पिंपळे गुरव,नवी सांगवी पुणे यांचे वाढत्या गुन्हेगारी कारवाया तसेच त्याअनुषंगाने त्यांचेवर केलेले प्रतिबंधक कारवाईस ते जुमानत नसल्याने व त्यांनी त्यांचे गुन्हेगारी कारवाया चालु ठेवुन वरील टोळीप्रमुख आरोपी रब्बील रज्जाक शेख याचे नमुद साथीदार यांनी टोळीप्रमुख याचे नावाचा धाक दाखवुन दिनांक १६/०६/२०१७ रोजी खडकी बस स्टँड जवळ पथारी लावणारे पथारीधारक यांना हत्याराचा धाक दाखवुन मासिक १०,०००/- रु ची मागणी केली व ते देण्यास तक्रारदार व साक्षीदार यांनी नकार दिल्याने त्यांना मारहाण करुन जिवे ठार मारण्याची धमकी देवुन त्यांचेकडुन जबरदस्तीने खंडणी स्वरुपात पैसे घेतलेबाबत फिर्यादी यांनी दिलेले तक्रारीवरुन त्यांचेवर खडकी पोलीस ठाणे येथे खंडणीचा गुन्हा दाखल झाला.

टोळीप्रमुख आरोपी हा गुन्हा दाखल झाले दिनांकापासुन फरार झाला होता. टोळीप्रमुख आरोपीचा शोध घेणेकामी तपासाचे कौशल्य वापरुन, पाठपुरावा करुन तो मुंब्रा येथे असलेबाबत मिळालेले माहीती वरुन त्यास पकडुन, दाखल गुन्हयाचे कामी दिनांक ०१/११/२०१७ रोजी अटक केली आहे.

दाखल गुन्हयाचे तपासामध्ये आरोपींनी गुन्हा संघटीतपणे आपले स्वतःचे व टोळीचे अवैध आर्थिक फायदयासाठी तसेच टोळीचे वर्चस्वातुन केल्याचे निदर्शनास आल्याने लक्ष्मण बोराटे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, खडकी पोलीस ठाणे यांनी त्यांचेविरुध्द संघटीत गुन्हेगारी प्रतिबंधक कायदयाप्रमाणे (मोका) कारवाई होणेकामी श्री.शशीकांत शिंदे, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, पुणे शहर यांना श्री. दिपक साकोरे, पोलीस उपायुक्त, परिमंडळ – ४, पुणे शहर यांचे मार्फतीने पाठविलेले प्रस्तावान्वये कलमवाढ करणेबाबत परवानगी प्राप्त झाली.

कायदयातील तरतुदीप्रमाणे सदर गुन्हयाचा तपास तत्कालीन सहा पोलीस आयुक्त श्री वसंत तांबे व त्यांचे नंतर श्री गणेश गावडे, सहा पोलीस आयुक्त, खडकी विभाग, पुणे शहर यांनी हाती घेवुन वेळोवेळी श्री रविंद्र कदम, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर, श्री. रविंद्र सेनगावकर, अपर पोलीस आयुक्त, उत्तर प्रादेशिक विभाग, पुणे शहर, श्री दिपक साकोरे, पोलीस उपायुक्त, परिमंडळ – ४, पुणे शहर यांचे मार्गदर्शनाखाली तपास करुन, तपासाचा अखेरचा अहवाल श्रीमती रश्मी शुक्ला, पोलीस आयुक्त, पुणे शहर यांना सादर केला असता, झाले तपासाचे कागदपत्रांचे सुक्ष्म अवलोकन करुन, वर नमुद तीन आरोपी यांचेविरुध्द दोषारोपपत्र पाठविणेस परवानगी दिली आहे.